**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.४७/२०२३ मधील**
**निशाण क्र.३४ खालील आदेश**

[ CNR No.MHKO090003772023 ]

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये मूळ अर्जामध्ये दुरूस्ती करणेकरिता सादर केला आहे.

२. अर्जदार यांचे असे कथन आहे की, काही तांत्रीक चुकीमुळे अर्जामध्ये काही बाबी नमूद करणे राहून गेले. तरी प्रस्तुतच्या अर्जान्वये मूळ अर्जात दुरूस्ती करुन "मयत दत्तू आप्पा चव्हाण, मयत जिवबा आप्पा चव्हाण, मयत जयराम आप्पा चव्हाण, मयत तुकाराम आप्पा चव्हाण, मयत कल्लाप्पा आप्पा चव्हाण व मयत तुळसाबाई महादेव पाटील हे वारस आहेत", असा मजकूर लिहिण्याची परवानगी मिळावी. तसेच "मयत वारस म्हणजे मुलगा" हा मजकूर काढून टाकण्याची देखील परवानगी मिळावी. सदरील दुरूस्तीमुळे अर्जाच्या स्वरुपात किंवा विषयामध्ये कुठलाही बदल होणार नाही. सबब प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणेत यावा.

३. वि.प. क्र.३ यांनी प्रस्तूतचे अर्जास तीव्र आक्षेप नोंदविला. वि.प.क्र.३ यांनी असे कथन केले की, प्रस्तुतचा अर्ज खोटा, चुकीचा व वस्तुस्थितीला सोडून आहे. मूळ अर्ज हा सन २०२३ साली दाखल करण्यात आला आहे. सदर दाखल तारखेवर विलंबाने दुरूस्ती मागण्याचे कारण अर्जामध्ये नमूद नाही. तसेच प्रस्तुतच्या दुरूस्तीमुळे गुंतागूंतीची परिस्थिती निर्माण होईल. तसेच प्रस्तुतची दुरूस्ती ही कलम ११ मध्ये मागता येणार नाही. सबब प्रस्तुतचा अर्ज खारीज करणेत यावा.

४. दोन्ही पक्षांचे कथन ऐकण्यात आले. मूळ अर्ज हा वारस प्रमाणपत्र मिळण्याकरिता सादर करणेत आला आहे. मागण्यात आलेली दुरूस्ती ही केवळ वारसांबद्दल माहिती सांगणारी आहे. त्यामुळे मूळ अर्जामध्ये प्रस्तुतच्या दुरूस्तीमुळे कुठलाही बदल होणार नाही. मान्यतः प्रस्तुतची दुरूस्ती ही विलंबाने मागण्यात आली आहे. तथापि, सदरील विलंबाकरिता योग्य तो दंड आकारलेस संयुक्तिक होईल. तसेच विरुध्द पक्षात प्रस्तावित दुरूस्तीस म्हणणे मांडण्याची संधी प्राप्त असलेने त्यांचे नुकसान होईल, असे देखील म्हणता येणार नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे :-

## **आदेश**

१) प्रस्तुतचा अर्ज रक्कम रु.५००/- (अक्षरी रक्कम रुपये पाचशे मात्र) इतक्या दंडावर मंजूर करण्यात येतो. दंडाची रक्कम वि.प.क्र.३ यांना अदा करणेत यावी.

२) दंडाची रक्कम अदा केलेनंतर, अर्जदार यांनी प्रस्तूत अर्जामध्ये नमूद केलेप्रमाणेची दुरूस्ती मूळ अर्जामध्ये करुन दुरूस्त प्रत अभिलेखावर सादर करावी.

Digitally signed by NARENDRA
Date: 2025.07.23 11:57:36 +0530

स्थळ : गडहिंग्लज.
दिनांक : २२.०७.२०२५.

( न. श्री. पुरी )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
गडहिंग्लज